draft


# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगीरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर:-४४० ००१.
दूरध्वनी : ०७१२-२५५०६७०, Fax : ०७१२-२५५०६७५


आदेश

क्रमांक - कक्ष१/रोहया/प्रक्र. ७० / ५४ /२०१४-१५
नागपूर - ४४० ००१, दिनांक १०/८/२०१५

विषय: रोपवन संदर्भात वन अधिका-यांकरिता निरीक्षणाची मानके निश्चित करणे.

संदर्भ: १) प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे आदेश क्रमांक कक्ष१/योजना/इए/मवाप्र/९५-९६/१३ दिनांक १३/१०/१९९५
२) मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन), म.रा. नागपूर यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष८/प्रक्र.१६/११४० दिनांक ४/२/२०१५

रोपवनाचे क्षेत्रीय कामात गुणात्मक सुधारणा करण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय कामाचे विविध अवस्थेमध्ये वेळोवेळी निरीक्षण करणे आवश्यक असल्याने उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये रोपवनाचे क्षेत्रिय कामाचे निरीक्षणाचे मापदंड ठरविण्यात आले. परंतु मूल्यांकन शाखेकडून करण्यात आलेल्या मूल्यांकनात उपरोक्त आदेशान्वये देण्यात आलेले मापदंडानुसार निरक्षण केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, निरीक्षण व पर्यवेक्षणाचे अभावी रोपवन कामाची अंमलबजावणी व गुणवत्ता मध्ये घसरण झालेली आहे व यशस्वी रोपवनाचे प्रमाण कमी झालेले आहे. रोपवन कामावर दर वर्षी मोठी रक्कम खर्च केल्या जात असून सदर रोपवनाचे संगोपन व संरक्षण करणे व रोपवने यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. क्षेत्रीय अधिका यांकडे असलेल्या विविध कामांचा व्याप लक्षात घेता उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये ठरविण्यात आलेल्या मापदडात सुधारणा करण्यात येत असून सुधारीत निरीक्षणाचे मापदंड, कर्तव्य व जबाबदा-या यासोबत जोडलेले आहे. सदर मापदंडानुसार रोपवने, जल व मृद संधारण कामे व रोपवाटिकेच्या कामाची तपासणी व निरीक्षण करण्यात येईल याची दक्षता घ्यावी व सदर सूचनांचे पालन न करणा-या अधिकारी व कर्मचा-यां विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. रोपवन कामाचे उद्दिष्ट निश्चित करतांना या आदेशातील तरतूदींचा विचार करण्यात यावा. सदर मापदंडांचे व कर्तव्य व जबाबदा-याचे पालन होते किंवा कसे याबाबत मुख्य वन संरक्षक यांनी उप वन संरक्षक, विभागीय वन अधिकारी / उप विभागीय वन अधिकारी यांचे मासिक बैठकीत आढावा घेऊन संनियंत्रण करावे. उप वन संरक्षक, विभागीय वन अधिकारी / उप विभागीय वन अधिकारी यांनी सुध्दा सदर सूचनांचे अंमलबजावणी करिता दर महिन्यात आढावा घेऊन व त्याचे पालन करण्यासाठी दक्षता घ्यावी. सदर आदेश सर्व उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी / उप विभागीय वन अधिकारी, सहाय्यक वन संरक्षक, वन परिक्षेत्र अधिकारी व वनपाल यांचे नजरेस आणून द्यावे.

सहपत्र १ ते १३ पाने

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी / उप विभागीय वनअधिकारी (प्रादेशिक) (सर्व)



Scanned by CamScanner

## क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांकरिता रोपवन, जल व मृद संधारण कामे व रोपवाटिकेच्या निरीक्षणाचे मानके, कर्तव्य व जबाबदा-या

### १. वनपाल/(क्षेत्रसहाय्यक/परिमंडल अधिकारी)

(१) रोपवन स्थळाचे विहित पध्दतीनुसार सर्व्हेक्षण व सिमांकन करणे.

(२) रोपवनात १००मी x५०मी ची ग्रीड टाकणे, चाचणी खड्डे खोदणे.

(३) प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच कामास सुरुवात करणे.

(४) रोपवनाचे काम सुरु झाल्यानंतर वारंवार रोपवन स्थळास भेट देऊन रोपवनातील विविध कामे योग्यरीत्या केले जातील याकडे लक्ष देणे.

(५) प्रत्येक कामाची १००% तपासणी करणे, कामाची गुणवत्ता राखणे.

(६) पूर्व पावसाळी कामे व सर्व रोपवनाचे ५ वे वर्ष पर्यंत, पर्यायी वनीकरण रोपवनाचे १० वे वर्ष पर्यत प्रत्येक रोपवनास वारंवार भेट देणे, संरक्षण व इतर कामे योग्यरीत्या होत असल्याची खात्री करणे.

(७) पूर्व पावसाळी कामे सुरु असतांना गुरे प्रतिबंधक चर व रोपवनाची हद्द योग्यरीत्या केली जाईल याची खात्री करणे, रोपवनाच्या हद्दीवर वनेत्तर क्षेत्र असल्यास त्या ठिकाणी योग्यरीत्या बुरुज घालणे.

(८) प्रत्येक नालाबांधास अनुक्रमांक देऊन कामाची मात्रा घनमिटर मध्ये दर्शविणे व नालाबांधाची गुणवत्ता राहील याची खात्री करणे.

(९) पूर्व पावसाळी कामात खड्डे, समतल चर, जलशोषक चर, नैसर्गिक पुनरुत्पादन, गुरे प्रतिबंधक चर, इतर कुंपण इत्यादीचे खोदकाम तसेच काटेरी तार कुंपण, chainlink कुंपण इत्यादी अंदाजपत्रकात विहित केल्याप्रमाणे करणे व कामाची गुणवत्ता चांगली राहील याची खात्री करणे.

(१०) कार्यआयोजनेत विहित केल्याप्रमाणे रोपवनात असलेल्या नैसर्गीक पुनरुत्पादीत रोपांवर योग्यरीत्या उपचार केले जाईल याची खात्री करणे.

(११) रोपवाटिकेत माती व रेती वर सुर्यप्रकाशाचा उपचार (solarisation) करणे मातीचे मिश्रण योग्य प्रमाणात असणे बाबत खात्री करणे, रोपे तयार करण्यासाठी विहित केलेल्या मापदंडानूसार व गुणवत्ता जोपासून रोपे वाढविण्यासाठी कामे करणे.

(१२) रोपवाटिकेच्या कामाची १००% तपासणी करुन कामे योग्य असल्याची खात्री करणे.

(१३) रोपवाटिकेच्या संरक्षणाकरिता वारंवार रोपवाटिकेची पाहणी करणे, रोपांची वाढ, रोपांना होणारे रोग इत्यादी बाबत वेळोवेळी पाहणी करणे व त्याच्या उपचारासाठी वेळेवर कारवाई करणे, संकलन केलेल्या बीयांची योग्यरीत्या साठवण करणे.

Scanned by CamScanner

(१४) रोपवनातील रोपांच्या संगोपनासाठी नींदणी, debudding, मातीचा भरभांगलन खत देणे इत्यादी कामे सुरु असतांना कामास वारंवार भेट देऊन सदर कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करणे.

(१५) रोपे लागवड सुरु करण्यापूर्वी संबंधित मजुरांना रोपे लागवडीसाठी योग्य पध्दतीची प्रात्याक्षिक करुन दाखविणे व रोपांची लागवड योग्यरीत्या करण्याची खात्री करणे.

(१६) गुरे प्रतिबंधक चर, जैविक काटेरी कुंपण, तार कुंपण इत्यादी सर्व कुंपण कामे योग्यरीत्या करणे, प्रथम वर्षी उंचवटयावर घायपात व इतर काटेरी प्रजातीची लागवड वेळेवर करणे व त्याची वाढ होण्यासाठी ३ वर्ष पर्यंत नींदणी, मरअळी भरणे, ५ वर्षा पर्यंत कुंपणाची वेळेवर दुरुस्ती व देखभाल करणे.

(१७) गुरे प्रतिबंधक चर व इतर माध्यमातून संपूर्ण भोवताल कुंपण निर्माण करणे, ५ वर्षा पर्यत दुरुस्त व देखभाल करणे, कामाची गुणवत्ता राखणे.

(१८) जीवंत रोपांची टक्केवारी ५ वर्षापर्यत व पर्यायी वनीकरण व रोपवनांची १० वर्षा पर्यंत मे व ऑक्टोबर महिन्यात मोजणी करुन रोपवन नोंदवहीत नोंदवून अहवाल सादर करणे.

(१९) मूल्यांकन विभागाकडून करण्यात येणा-या मूल्यांकन कामाचेवेळी रोपवनात उपस्थित राहून मूल्यांकन कामात संपूर्ण सहाकार्य देणे, आवश्यक माहिती व अभिलेख मूल्यांकन विभागास सादर करणे.

(२०) रोपवनाचे आगीपासून संरक्षणाकरिता रोपवनाभोवती व अंतर्गत जाळ रेषा तयार करणे व रोपवनास आग लागणार नाही याची खात्री करणे.

(२१) रोपवन क्षेत्रात गुरांची चराई न होण्याकरिता कारवाई करणे, स्थानिक लोकांकडून रोपवनाचे संरक्षणाकरिता मदत प्राप्त करणे.

(२२) रोपवन क्षेत्राच्या देखभालीसाठी लावण्यात आलेल्या मजुरांकडून रोपवन क्षेत्राचे संरक्षण योग्यरीत्या करुन घेणे, गुरे प्रतिबंधक चराची देखभाल व दुरुस्ती त्यांचेकडून करुन घेणे व संरक्षक मजुरांचे कामवार नियंत्रण ठेवणे, संरक्षक मजुरांच्या कामगिरीबाबत वन परिक्षेत्र अधिकारी यांना मासिक अहवाल सादर करणे.

(२३) रोपवनातील रोपांना रोग झाल्यास त्याबाबत उपचाराकरिता योग्य कारवाई करणे.

(२४) रोपांना योग्य प्रमाणात व विहित पध्दतीनुसार खत देणे बाबत खात्री करणे.

(२५) रोपवनातील सर्व कामे तांत्रिक दृष्टया योग्य पध्दतीने करणेबाबत खात्री करणे.

(२६) वरीष्ठ अधिका-यांनी रोपवनाची पाहणी केल्यावर पाहणीचेवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करणे.

Scanned by CamScanner

२. वन परिक्षेत्र अधिकारी

(१) रोपवन स्थळाची निवड करुन विहित पध्दतीनुसार सर्व्हेक्षण व सिमांकन करणे.

(२) रोपवनात १००मी x५०मी ची ग्रीड टाकणे, चाचणी खड्डे खोदणे व विहित पध्दतीनुसार उपचार नकाशा तयार करणे.

(३) रोपवनातील जागेच्या परिस्थितीनुसार स्थळानुरुप अंदाजपत्रक तयार करणे.

(४) अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त करणेबाबत/मंजूरी देणेबाबत योग्य कार्यवाही करणे.

(५) प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच कामास सुरुवात करणे.

(६) केलेल्या प्रत्येक कामाची ग्रीड निहाय नोंद मोजमाप पुस्तिकेत घेणे.

(७) रोपवनाचे काम सुरु झाल्यानंतर वारंवार रोपवन स्थळास भेट देऊन ५ वर्ष पर्यंत, पर्यायी वनीकरण कामास १० वर्ष पर्यंत रोपवनातील विविध कामे योग्यरीत्या केले जातील याकडे लक्ष देणे.

(८) प्रत्येक कामाची १००% तपासणी करणे, त्यानुसार मोजमाप पुस्तिकेत प्रमाणित करुन दिनांकासह स्वाक्षरी करणे.

(९) पूर्व पावसाळी कामे व सर्व रोपवनाचे ५ वे वर्ष पर्यंत व पर्यायी वनीकरण रोपवनास १० वर्षा पर्यंत प्रत्येक रोपवनास वारंवार भेट देणे, संरक्षण व इतर कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करणे.

(१०) पूर्व पावसाळी कामे सुरु असतांना गुरे प्रतिबंधक चर व रोपवनाची हद्द योग्यरीत्या करण्याची खात्री करणे. रोपवनाच्या हद्दीवर वनेत्तर क्षेत्र असल्यास त्या ठिकाणी योग्यरीत्या बुरुज लावणे.

(११) गुरे प्रतिबंधक चर, दगडी थाल, खड्डा खोदून प्रोसोपिस इत्यादीच्या माध्यमातून रोपवनाच्या भोवताल कुंपण निर्माण करणे, कामाची गुणवत्ता राखणे, कुंपण अधूनमधून उघड राहणार नाही याची खात्री करणे, ३ वर्षा पर्यंत उंचवटयावर घायपातच्या वाढीकरिता नींदणी, मरअळी भरणे, ५ वर्ष पर्यंत कुंपणाची दुरुस्ती देखभाल करणे.

(१२) जुन्या गुरे प्रतिबंधक चराची दुरुस्ती व जुन्या नालाबांधाची दुरुस्ती प्रस्तावित असल्यास त्याबाबत पंचनामा करुन सहाय्यक वन संरक्षक यांचेकडून आवश्यक ती दुरुस्ती बाबत प्रमाणित करुन घेणे.

(१३) प्रत्येक नालाबांधास अनुक्रमांक देऊन कामाची मात्रा घनमीटर मध्ये ग्रीडनिहाय मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे.

(१४) पूर्व पावसाळी कामात खड्डे, समतल चर, जलशोषक चर, नैसर्गिक पुनरुत्पादन, गुरे प्रतिबंधक चर, इतर कुंपण इत्यादी काम तसेच काटेरी तार कुंपण, chainlink कुंपण इत्यादी अंदाजपत्रकात विहित केल्याप्रमाणे आहे व कामाची गुणवत्ता चांगली आहे याची खात्री करणे.

Scanned by CamScanner

(१५) रोपवनात असलेल्या नैसर्गीक पुनरुत्पादित रोपांवर उपचार योग्यरीत्या व कार्यआयोजनेत विहित केल्याप्रमाणे करण्याची खात्री करणे, ५ वर्ष पर्यंत ग्रिडच्या कोप-यातील गवत काढून साफ ठेवण्याची दक्षता घेणे.

(१६) रोपवाटिकेत माती व रेतीचा सपर्यप्रकाश उपचार (solarsation) करणे, मातीचे मिश्रण योग्य प्रमाणात असणे बाबत खात्री करणे. रोपे तयार करण्यासाठी विहित पध्दतीनुसार व गुणवत्ता जोपासून रोपे वाढविण्यासाठी कामे करणे.

(१७) रोपवाटिकेच्या कामाबाबत रोपवाटिका नोंदवही व मोजमाप पुस्तिका अद्यावत ठेवणे व केलेल्या कामाची १००% तपासणी करुन त्यानुसार मोजमाप पुस्तिकेत प्रमाणित करणे, तसेच दिनांकासह स्वाक्षरी करणे, रोपवाटिकेच्या वारंवार पाहणी करणे, रोपांची वाढ, रोपांना होणारे रोग इत्यादी बाबत वेळोवेळी पाहणी करणे व त्याच्या उपचारासाठी वेळेवर कारवाई करणे, संकलन केलेल्या बीयांची योग्यरीत्या साठवण करणे.

(१८) रोपवनातील रोपांच्या संगोपनासाठी नींदणी व debudding, मातीचा भरभांगलन इत्यादी कामे सुरु असतांना कामास वारंवार भेट देऊन सदर कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करणे.

(१९) रोपे लागवड सुरु करण्यापूर्वी संबंधित मजुरांना रोपे हाताळणे, रोपे लागवडीसाठी योग्य पध्दतीचे प्रात्याक्षिक करुन दाखविणे व रोपांची लागवड योग्यरीत्या करण्याची खात्री करणे, रोपांचे वाहतूक नियोजन करणे रोपेलागवड वेळेवर व योग्यरीत्या करण्याची खात्री करणे.

(२०) गुरे प्रतिबंधक चर, जैविक काटेरी कुंपण, तार कुंपण इत्यादी सर्व कुंपण कामे योग्यरीत्या करणे, गुरे प्रतिबंधक चराच्या उंचवटयावर घायपात व इतर काटेरी प्रजातीची लागवड वेळेवर करणे व त्याची वाढ होण्यासाठी ३ वर्ष पर्यंत नींदणी, मरअळी भरणे, ५ वर्ष पर्यंत कुंपणाची वेळेवर दुरुस्ती व देखभाल करणे.

(२१) रोपांना निंदणी, मातीचा भरभांगलन, ग्रिडच्या कोप-याजवळील गवत काढून टाकणे, इत्यादी सर्व कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करणे.

(२२) जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची ५ वर्षापर्यत व पर्यायी वनीकरण रोपवनात १० वर्ष पर्यंत मे व ऑक्टोबर महिन्यात अंदाज करुन त्यानुसार रोपवन नोंदवहीत नोंद करणे.

(२३) ग्रीडनिहाय चाचणी खड्डयाच्या खोलीचा तपशील रोपवन नोंदवहीत नमुद करणे.

(२४) बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतुद व झालेल्या खर्चाबाबत, आग, अवैध वृक्षतोड, अवैध चराई इत्यादी माहिती रोपवन नोंदवहीत नमुद करणे व दिनांकासह स्वाक्षरी करणे.

Scanned by CamScanner

(२५) मूल्यांकन विभागाकडून करण्यात येणा-या मूल्यांकन कामाचेवेळी रोपवनात उपस्थित राहून मूल्यांकन कामात संपूर्ण सहाकार्य देणे, आवश्यक माहिती व अभिलेख मूल्यांकन विभागास सादर करणे.

(२६) रोपवनाचे आगीपासून संरक्षणाकरिता रोपवनाभोवती व अंतर्गत जाळ रेषा तयार करणे व रोपवनास आग लागणार नाही या करिता दक्षता घेणे.

(२७) रोपवन क्षेत्रात गुरांची चराई न होण्याकरिता कारवाई करणे, स्थानिक लोकांकडून रोपवनाचे संरक्षणाकरिता मदत प्राप्त करणे.

(२८) रोपवन क्षेत्राच्या देखभालीसाठी लावण्यात आलेल्या मजुरांकडून रोपवन क्षेत्राचे संरक्षण योग्यरीत्या करुन घेणे, गुरे प्रतिबंधक चराची देखभाल व किरकोळ दुरुस्ती त्यांचेकडून करुन घेणे व संरक्षक मजूरांच्या कामावर नियंत्रण ठेवणे.

(२९) रोपवनातील रोपांना रोग झाल्यास त्याबाबत उपचाराकरिता योग्य कारवाई करणे. रोपांना योग्य प्रमाणात व विहित पध्दतीनुसार खत देणे बाबत खात्री करणे.

(३०) रोपवनातील सर्व कामे तांत्रिक दृष्टया योग्य पध्दतीने करणेबाबतची खात्री करणे.

(३१) वरीष्ठ अधिका-यांनी रोपवनाची पाहणी केल्यावर पाहणीचेवेळी देण्यात आलेल्या सूचनांबाबत नोंद घेणे व त्याबाबत केलेल्या कारवाईचा अनुपालन अहवाल १५ दिवसात संबंधित अधिका-यांना सादर करणे.

(३२) रोपवनाची मोजमाप पुस्तिकेत व रोपवन नोंद वहीत अद्यावत माहिती नोंद करणे व दिनांकासह स्वाक्षरी करणे. रोपवनाच्या पाहणी करिता आलेल्या वरिष्ठ अधिका-यांना अद्यावत मोजमाप पुस्तिका व रोपवन नोंद वही सादर करणे.

(३३) सर्व रोपवनांची पूर्व पावसाळी कामे व प्रथम वर्षात लागवड कामे पूर्ण झाल्यावर गुरे प्रतिबंधक चराच्या सध्यस्थितीसह पूर्ण करण्यात आलेल्या सर्व कामांबाबत पूर्णत्व अहवाल उप वन संरक्षक / सहाय्यक वन संरक्षक यांना सादर करणे, ५ वर्ष पूर्ण झाल्यावर रोपवनाची सध्यस्थिती, गुरे प्रतिबंधक चराचा जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांच्या सरासरी उंची, संरक्षण, चराई नियंत्रण, खर्च इत्यादी बाबत पूर्णत्व अहवाल सादर करणे.

(३४) रोपवनास भेट दिलेल्या प्रत्येक वेळी पाहणीबाबत रोपवन नोंदवहीत नमुद करुन दिनांकासह स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

**३. सहायक वन संरक्षक :**

Scanned by CamScanner

**अ) रोपवन पूर्व तयारी व पूर्व पावसाळी कामे :**

(१) **स्थळ निवड :** वनपरिक्षेत्र अधिका-यांनी निवड केलेल्या सगळया रोपवन स्थळांना भेटी देवून स्थळ निवड योग्य आहे अगर कसे हे ठरवतील. वन परिक्षेत्र अधिकारी यांनी निवड केलेले रोपवन स्थळ योग्य असल्याबद्दल प्रमाणपत्र अंदाजपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

(२) **उपचार नकाशा :** प्रत्यक्ष मोक्यावर जावून १० टक्के ग्रिड मधील चाचणी खड्डे, बेसलाईन, ग्रिडचा कोप-यांवर लावलेले पिल्लर, नैसर्गिक पूनरूत्पादनस्थिती, इत्यादी संपूर्ण तपासणी करून त्या अनुषंगाने वन परिक्षेत्र अधिका-यांनी तयार केलेला उपचार नकाशा योग्य आहे अगर कसे हे तपासतील, खात्री झाल्यावर तसे उपचार नकाशावर प्रमाणीत करून दिनांकासह स्वाक्षरी करतील. सदर कामात व उपचार नकाशामध्ये तृटी असल्यास सदर तृटी दुरुस्त करुन घेऊन सुधारित उपचार नकाशा तयार करुन घेतील व त्यावर दिनांकासह स्वाक्षरी करतील.

(३) अंदाजपत्रकाची पुर्ण छाननी करतील. अंदाजपत्रकामध्ये जागेच्या उपचारासाठी व शास्त्रोक्त उपचाराकरिता आवश्यक त्या बाबींचा समावेश करण्यात आला किंवा कसे याची तपासणी करुन खात्री करतील. सहा वर्षाच्या कालावधीकरिता एक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकास मंजूरी देणे किंवा मंजुरी प्राप्त करण्याकरिता पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

(४) पूर्व पावसाळी कामे सुरू असतांना सहायक वन संरक्षक रोपवनस्थळांस कमीत कमी २ वेळा भेटी देतील. प्रत्येक निरीक्षणाचे वेळी कमीत कमी १०% ग्रिडची random पध्दतीने निवड करतील. निवड केलेल्या ग्रिडमधील संपूर्ण कामांची तपासणी करतील. दुस-या निरीक्षणाच्या वेळी निवड करावयाचे ग्रिडस हे पहिल्या तपासणीचे वेळी निवड केलेल्या ग्रिडस व्यतिरिक्त असतील. निवड केलेल्या ग्रिड मधील गुरे प्रतीबंधक चर, खड्डे, नैसर्गिक पुनरूत्पादनाचे उपचार कामे, जाळरेषा आखणी, निरीक्षण पथ, नालाबांध, जलशोषक चर, V आकाराचे चर इ. कामाची संपूर्ण तपासणी करून करण्यात आलेल्या कामाची मात्रा व त्याची गुणवत्ता योग्य आहे किंवा कसे याबाबत मोजमाप पुस्तिकेत प्रमाणीत करून दिनांकासह स्वाक्षरी करतील. रोपवन कामाबाबत सूचना रोपवन वहीत नोंदवतील. खोदण्यात आलेला खड्डा विहीत मापाचा आहे व योग्य ठिकाणी खोदला जात आहे, चर समपातळीवर खोदले जात आहे इत्यादींबाबत तपासणी करुन खात्री करतील. गुरे प्रतीबंधक चर योग्यरीत्या करणे, व विहित मापाचा आहे व संपूर्ण भोवताल कुंपणाचे काम करण्याची खात्री करतील. रोपवन हद्द बरोबर आहे याबाबत शहनिशा करतील. नैसर्गिक पुनरूत्पादन रोपांचा उपचार योग्यरीत्या करणे, वृक्षाखाली खड्डे खोदले जाणार नाही याची खात्री करणे, इत्यादी बाबी तपासून खात्री करतील. सर्व पूर्व पावसाळी कामे उच्च प्रतीची राहतील यासाठी दक्षता घेतील.

(५) रोपवाटिका कामे: रोपवाटिकेत माती, शेण खत, रेतीचे मिश्रण व त्याची मात्रा सुरुवातीपासून तपासून मिश्रण योग्य प्रमाणात आहे याची खात्री करतील, त्याप्रमाणे रोपवाटिका नोंदवहीत प्रमाणित करतील व त्यानुसार प्रमाणपत्र उप वन संरक्षक यांना सादर करतील. त्यानंतरच मातीचे मिश्रण पिश्वीत भरणा करण्यास परवानगी देतील.

**ब) प्रथम वर्षीय कामे :**

(६) रोपलागवडीचे काम सूरू असतांना सहायक वन संरक्षक प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी दोन वेळा भेटी देतील व लागवड योग्यरीत्या करण्याची खात्री करतील. प्रत्येक रोपवनात random

Scanned by CamScanner

पध्दतीने १०% ग्रिडमधील रोपेलागवड केलेल्या कामाचे तपासणी करतील व त्यानुसार कामाची गुणवत्ता व मात्रा योग्य आहे किंवा कसे याबाबत मोजमाप पुस्तिकेत प्रमाणीत करून दिनांकासह स्वाक्षरी करतील. कामाबाबत सुधारणा व अन्य सूचना रोपवन नोंदवहीत प्रत्येक पाहणीच्या वेळी नोंदवतील. रोपे लागवड योग्यरीत्या करणेबाबत खात्री करतील.

(७) नींदणी : नींदणी व मातीचा भर भांगलन कामे सुरू असतांना सहायक वन संरक्षक प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी दोन वेळा भेटी देतील. प्रत्येक निरीक्षणाचे वेळी १०% ग्रिड निवडून प्रत्येक ग्रिडमधील संपूर्ण कामे तपासतील व त्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत लिहून कामाची मात्रा व प्रत चांगली आहे किंवा कसे याबाबत प्रमाणीत करून दिनांकासह स्वाक्षरी करतील. नींदणी व मातीचा भरभांगलन, गुरे प्रतिबंधक चराच्या उंचवटयावर घायपात इत्यादींची देखभाल, नींदणी, मरअळी भरणे इत्यादी कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करतील.

(८) संरक्षणाची कामे : प्रथम वर्षीय कामांकरिता उपरोक्त दर्शविलेल्या भेटी व्यतिरिक्त प्रत्येक स्थळाला कमीत कमी एक वेळा भेट देवून रोपवनाची स्थिती, अवैध चराई वर नियंत्रण ठेवणे, रोपांची वाढ, आगीपासून संरक्षण कामे, रोपांचे नुकसान इत्यादी कामांची पाहणी करतील, कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करतील व तृटी असल्यास सुधारणात्मक कार्यवाही करतील. याबाबत नोंदी रोपवन वहित नोंदवतील. तसेच सुधारणाबाबत सूचना रोपवन नोंद वहीत लिहतील. रोपवनास भेट देण्यात आलेल्या प्रत्येक भेटीत गुरे प्रतिबंधक चर, जैविक काटेरी कुंपणाची तपासणी करतील व लावण्यात आलेल्या घायपात, काटेरी प्रजातींच्या रोपांची देखभाल, नींदणी, मरअळी भरणे ची कामे योग्यरीत्या केली जातात किंवा कसे याबाबत तपासणी करतील व काम योग्यरीत्या केली जातील याची खात्री करतील. नींदणी व मातीचा भरभांगलन कामात काही उणिवा असल्यास त्याबाबत सुधारणा करण्यासाठी व कामे योग्यरीत्या केली जातील यासाठी खात्री करतील. वस्तुस्थिती व सुधारणाबाबत सूचना रोपवन नोंदवहीत नमुद करून दिनांकासह स्वाक्षरी करतील. गुरे प्रतिबंधक चर उंचवटा इत्यादींची दुरूस्ती वेळेवर होते किंवा कसे याचीही तपासणी करून खात्री करतील व आवश्यक सूचना देतील. गुरे प्रतिबंधक चर, उंचवटा, कुंपण पूर्ण भोवताल करणे, ३ वर्ष पर्यंत घायपात व प्रोसोपिसच्या वाढीसाठी निंदणी, देखभाल, मरअळी भरणे, ५ वर्ष पर्यंत त्याची दुरुस्ती देखभाल करण्याचा व सदर कामाची गुणवत्ता राखण्याची खात्री करतील.

(९) **जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांची वाढ:** ५ वर्ष पर्यत जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची पर्यायी वनीकरण रोपवनाबाबत १० वर्ष पर्यंत वन परिक्षेत्र अधिकारी योग्यरीत्या काढून रोपवन नोंदवहीत नमुद केले किंवा कसे याची खात्री करतील. तसेच नोंदविलेल्या जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची बिनचुक आहे किंवा कसे याची तपासणी व शहानिशा करुन त्यानुसार रोपवन नोंदवहीत नमुद करतील.

क) <u>व्दितीय वर्षीय कामे:</u>

(१०) **नींदणी** : नींदणी, मातीचा भर भांगलन काम सूरू असतांना सहायक वन संरक्षक, प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी दोन वेळा व प्रत्येक निंदणीचे वेळी एकदा भेट देतील. प्रत्येक निरीक्षणाचे वेळी १०% वेगवेगळे ग्रिड random पध्दतीने निवडून त्या ग्रिडमधील निंदणीचे काम तपासून कामाची मात्रा बरोबर आहे किंवा कसे, कामाची गुणवत्ता उत्कृष्ट आहे किंवा कसे याबाबत मोजमाप पुस्तिकेत प्रमाणित करतील व दिनांकासह स्वाक्षरी करतील. नींदणी व मातीचे भरभांगलन

Scanned by CamScanner

कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करतील. पाहणी बाबत व दिलेल्या सूचना रोपवन नोंदवहीत नमुद करतील.

(११) **संरक्षण व इतर कामे :** नींदणी सुरू असतांना दिलेल्या भेटीव्यतिरिक्त प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी एक वेळा भेट देवून रोपवनांची स्थितीबाबतच्या, रोपांची वाढ, चराई व आगीपासून संरक्षणाकरिता पुरेसा जाळरेषा, गुरे प्रतिबंधक चर उंचवटेची दुरूस्ती, मरअळी भरणे, नैसर्गिक रोपांचा उपचार इत्यादी कामे तपासतील कामात सुधारणेबाबत सूचना रोपवन नोंदवहीत लिहीतील व दिनांकासह स्वाक्षरी करतील, दिलेल्या सूचनेनुसार कामे पूर्ण करण्याची खात्री करतील. ग्रिडच्या कोप-यावर वेळोवेळी साफसफाई केल्या जाईल याची खात्री करतील. जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची योग्यरीत्या काढली किंवा कसे याची फेरतपासणी करतील व त्यानुसार नोपवन वहीत नमुद करीतल. गुरेप्रतिबंधक चर उंचवटेवर रोपे/घायपातची वाढ होण्यासाठी नींदणी, मरअळी भरणे, कुंपणाची तातडीने दुरुस्ती करणे, कुंपण कुठेही उघड होऊन खराब होणार नाही याची खात्री करतील व कामाची गुणवत्ता राखणेसाठी दक्षता घेतील.

<u>ड) तृतीय वर्षीय कामे :</u>

(१२) **नींदणी :** नींदणीची व मातीचा भरभांगलन कामे सुरू असतांना प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी एकदा भेट देवून random पध्दतीने निवडलेल्या १०% ग्रिडमध्ये केलेल्या नींदणी व मातीचा भरभांगलन कामाची तपासणी करुन कामाची गुणवत्ता व मात्रा योग्य असल्याची खात्री करतील व कामावर नियंत्रण ठेवतील याबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद करतील व दिनांकासह स्वाक्षरी करतील. सुधारणाबाबत सूचना रोपवन नोंदवहीत नोंदवतील.

(१३) **संरक्षण व इतर कामे :** नींदणी सुरू असतांना दिलेल्या भेटीव्यतिरिक्त प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी एक वेळा भेट देवून रोपवनांची स्थितीबाबतच्या, रोपांची वाढ, चराई व आगीपासून संरक्षणाकरिता पुरेसा जाळरेषा, गुरे प्रतिबंधक चर उंचवटेची दुरूस्ती, मरअळी भरणे, नैसर्गिक रोपांचा उपचार इत्यादी कामे तपासतील कामात सुधारणेबाबत सूचना रोपवन नोंदवहीत लिहीतील व दिनांकासह स्वाक्षरी करतील, दिलेल्या सूचनेनुसार कामे पूर्ण करण्याची खात्री करतील. ग्रिडच्या कोप-यावर वेळोवेळी साफसफाई केल्या जाईल याची खात्री करतील. जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची योग्यरीत्या काढली किंवा कसे याची फेरतपासणी करतील व त्यानुसार नोपवन वहीत नमुद करीतल. गुरेप्रतिबंधक चर उंचवटेवर रोपे/घायपातची वाढ होण्यासाठी नींदणी, मरअळी भरणे, कुंपणाची तातडीने दुरुस्ती करणे, कुंपण कुठेही उघड होऊन खराब होणार नाही याची खात्री करतील व कामाची गुणवत्ता राखणेसाठी दक्षता घेतील.

(१४) **<u>चतूर्थ व पंचम वर्ष</u>** : चवथ्या व पाचव्या वर्षी प्रत्येक रोपवन स्थळाला प्रतिवर्षी दोनदा भेट देवून रोपवनांचे संरक्षणाबाबतचा अभिप्राय रोपवन वहित नोंदवतील. चवथ्या व पाचव्या वर्षी रोपवनाचे संरक्षणाबाबत विशेष भर देऊन आगि पासून व अवैध चराई पासून रोपवनाचे संरक्षण करण्यासाठी कारवाई करतील व याबाबत क्षेत्रीय कर्मचा-यांना योग्य सूचना देतील. गुरे प्रतिबंधक चर व कुंपण ज्यां ठिकाणी खराब झालेले आहे त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत खात्री करतील. ग्रिडच्या कोप-यावर ५ वर्ष पर्यंत गवत काढून साफ ठेवणेबाबत खात्री करतील. रोपवनाचे रखवालदार रोपवनाचे संरक्षणाकडे लक्ष देणे बाबत व गुरे प्रतिबंधक चराची किरकोळ दुरुस्ती व देखभाल बाबत कामे करतात किंवा कसे याची तपासणी करुन काम योग्यरीत्या केली जातील याकडे लक्ष देतील. सहायक

Scanned by CamScanner

वन संरक्षकांनी रोपवन कामाच्या बाबतीत वेळोवेळी केलेले निरीक्षण, निरीक्षणाच्या वेळी आढळून आलेल्या त्रृटी/चांगल्या बाबी याबाबतचा अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह उप वन संरक्षक यांना सादर करतील. वन परिक्षेत्र अधिकारी यांनी काढलेल्या जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची तपासून खात्री करतील व त्यानुसार रोपवन वहीत नमुद करुन दिनांकासह स्वाक्षरी करतील.

(१५) रोपवनाच्या मूल्यांकनाच्या वेळी मूल्यांकन विभागास आवश्यक ते अभिलेख व माहिती उपलब्ध होणार याची खात्री करतील.

(१६) रोपवनात काही गंभीर स्वरुपाच्या अनियमितता आढळल्यास त्याबाबत तातडीने कार्यवाही करणे व त्याबाबत वरिष्ठ अधिका-यांच्या नजरेस आणून देणे आवश्यक राहील. रोपवनाची तपासणीचे वेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खात्री करणे व वरिष्ठ अधिका-यांनी रोपवनाचे निरीक्षणाचेवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल व रोपवनाचे कामात सुधारणा होईल याबाबत खात्री करणे ही सर्व सहाय्यक वन संरक्षकांची जबाबदारी राहील.

(१७) अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्या नंतरच कामे सुरु करण्यात येईल याची दक्षता घेतील. रोपवनावर झालेला खर्च योग्य आहे किंवा कसे यावर नियंत्रण ठेवतील. रोपवनातील जीवंत रोपांची टक्केवारी वेळोवेळी तपासणे, प्रथम व दूस-या वर्षी वेळेवर मरअळी भरणे बाबत कार्यवाही करणे, जीवंत रोपांची टक्केवारी व रोपांची सरासरी उंची योग्यरीत्या काढून त्याबाबत माहिती रोपवन नोंदवहीत नोंदविणे, वेळोवेळी झालेला बाबनिहाय खर्च रोपवन नोंद वहीत नोंदविणेबाबत खात्री करणे आवश्यक राहील.

(१८) रोपवनास ५ वर्ष पूर्ण झाल्यावर रोपवनातील जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांची सरासरी उंची, गुरेप्रतिबंधक चराची स्थिती, संरक्षणाची स्थिती, अवैध चराई इत्यादी बाबत रोपवन नोंदवहीत नमुद करुन स्वाक्षरी करतील. याबाबत उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी यांना अहवाल सादर करतील.

(१९) रोपवनास भेट दिलेल्या प्रत्येक वेळी पाहणीबाबत रोपवन नोंदवहीत नमुद करुन दिनांकासह स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. कामाची मात्रा, गुणवत्ताबाबत तपासणी करुन मोजमाप पुस्तिकेत नोंद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

## ४. उप वन संरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उप विभागाचे उप विभागीय वन अधिकारी

(१) **उपचार नकाशे :** एकूण रोपवन स्थळांपैकी २०% रोपवन स्थळामधील ५% ग्रीडची निवड करुन तपासणी करतील. रोपवन स्थळाची निवड व उपचार नकाशाबाबत सहाय्यक वनसंरक्षक यांनी केलेली तपासणी व दिलेले प्रमाणपत्र योग्य आहे किंवा कसे याबाबत निरीक्षणाचेवेळी random पध्दतीने निवडलेल्या २०% रोपवन स्थळाबाबत तपासणी करतील. ५% ग्रीडच्या केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने अंदाजपत्रकाची छाननी करतील. अंदाजपत्रक जागेच्या परिस्थितीनुसार व शास्त्रोक्त पध्दतीने उपचार देण्याकरिता आवश्यक त्या बाबींचा समावेश करुन योग्यरीत्या तयार करण्यात आले किंवा कसे याची शहनिशा करतील व आवश्यकता भासल्यास त्यात सुधारणा करण्यासाठी कारवाई करतील.

(२) **रोपवन पूर्व तयारी कामे:** प्रत्येक रोपवन स्थळाला कमीत कमी एकदा भेट देवून गुरे प्रतिबंधक चर, खड्डे, मृदसंधारणाची कामे, जलशोषक चर, V आकाराचे चर, कार्यआयोजनेतील सूचनेनुसार नैसर्गिक पूनरुत्पादनाचा उपचार, फुटवांचे एकेरीकरण, नैसर्गिकरीत्या वाढलेल्या रोपांच्या वाढीसाठी

Scanned by CamScanner

दाट रोपे कमी करणे इत्यादीची तपासणी करतील व त्याबाबतच्या नोंदी रोपवन वहित घेतील. रोपवनाचे तपासणीचे वेळी ५% ग्रीड random पध्दतीने निवडून सदर ग्रीड मध्ये कामे व मात्रा योग्य आहे किंवा कसे याची तपासणी करुन त्यानुसार मोजमाप पुस्तिकेत नमुद करुन दिनांकासह स्वाक्षरी करतील. पाहणीचेवेळी सुरु असलेली कामे जसे की, गुरे प्रतिबंधक चर, खड्डे इत्यादी कामे तांत्रिक दृष्टया योग्यरीत्या होईल याची खात्री करतील. गुरेप्रतिबंधक चर उंचवटा पूर्ण भोवताल करणे, कामाची गुणवत्ता राखणे बाबत खात्री करतील. कामाबाबत, तृटी सुधारणाबाबत रोपवन नोंदवहीत सूचना नमुद करतील. दिलेल्या सूचनांचे अनुपालन होणेबाबत खात्री करतील.

**क) प्रथम वर्षीय कामे :**

(३) **रोप लागवड :** रोपे लागवडीचे काम सुरू असतांना ५०% रोपवन स्थळांना कमीत कमी एकदा भेट देतील, त्यातील कामाची तपासणी करतील रोपांची वाहतूक योग्यरीत्या करणे, रोपे लागवड करतांना योग्यरीत्या हाताळणे, योग्य पध्दतीने लागवड करणे इत्यादी कामे योग्यरीत्या केली जातील याची खात्री करतील. रोपे लागवडीबाबत वस्तुस्थिती व सूचना रोपवन नोंदवहीत नोंदवतील.

(४) **नींदणी व इतर कामे :** नींदणी सुरू असतांना कमीत कमी १०% रोपवनस्थळाला भेट देतील. निरीक्षणाचेवेळी नींदणी व मातीचा भरभांगलन कामे, गुरे प्रतिबंधक चर उंचवटयांवर रोपांची लागवड, निंदणी, मरअळी भरणे, उंचवटयांची दुरुस्ती योग्यरीत्या होते किंवा कसे याची तपासणी करुन कामाची गुणवत्ता राखण्यासाठी योग्य कारवाई करतील व याबाबत सूचना रोपवन नोंदवहीत नोंदवतील.

(५) **संरक्षणाची कामे :** रोपे लागवड व निंदणीचे वेळी दिलेल्या भेटीव्यतिरिक्त ५०% रोपवन स्थळाला कमीत कमी एकवेळा भेट देऊन रोपवनाचे संरक्षण कसे होत आहे याचा आढावा घेतील. गुरे प्रतिबंधक चराची दुरुस्ती व देखभाल, उंचवटयावर घायपात व इतर काटेरी प्रजातीची रोपे लागवड व देखभाल, मरअळी भरणे, गुरे चराई पासुन संरक्षण, रोपांची सरासरी उंची, जीवंत रोपांची टक्केवारी, आगिपासून संरक्षण कामे योग्यरीत्या होईल याची खात्री करतील व याबाबत तृटी व सूचना रोपवन नोंदवहीत लिहून दिनांकासह स्वाक्षरी करतील व दिलेल्या सूचनांचे पालन होईल यासाठी पाठपुरावा करतील.

**ड) व्दितीय वर्षीय कामे :**

(६) **नींदणी :** नींदणी व मातीचे भरभांगलन सुरू असतांना प्रत्येक निंदणीच्या वेळी कमीत कमी १०% रोपवन स्थळांना भेट देतील. त्यातील निंदणीच्या कामाची तपासणी करून अभिप्राय रोपवन वहित नोंदवतील. निरीक्षणाचेवेळी नींदणी व मातीची भरभांगलन कामे योग्यरीत्या होते किंवा कसे याची तपासणी करुन कामाची गुणवत्ता राखण्यासाठी योग्य कारवाई करतील व याबाबत सूचना रोपवन नोंदवहीत नोंदवतील.

(७) **संरक्षणाची कामे :** ५०% रोपवनाला एकदा भेट देऊन रोपवनाच्या संरक्षणाबाबतच्या नोंदी रोपवन नोंद वहीत नोंदवतील. गुरे प्रतिबंधक चराची दुरुस्ती व देखभाल, उंचवटयावर घायपात व इतर काटेरी प्रजातीची रोपे लागवड व देखभाल, मरअळी भरणे, रोपवनाचे गुरे चराई पासून संरक्षण, रोपांची सरासरी उंची, जीवंत रोपांची टक्केवारी, आगिपासुन संरक्षण इत्यादी कामे योग्यरीत्या होईल

Scanned by CamScanner

याची खात्री करतील व याबाबत तृटी व सूचना रोपवन नोंदवहीत लिहून दिनांकासह स्वाक्षरी करतील व दिलेल्या सूचनांचे पालन होईल यासाठी पाठपूरावा करतील.

**इ) तृतीय वर्षीय कामे :**

(८) **नींदणी :** नींदणी /मातीचा भरभांगलन सुरू असतांना कमीत कमी १०% रोपवन स्थळांना उपवनसंरक्षक भेट देतील. त्यातील निंदणीच्या कामाची तपासणी करतील व अभिप्राय रोपवन वहित नोंदवतील. कामात तृटी असल्यास सुधारणासाठी आवश्यक कार्यवाही करतील.

(९) **संरक्षणाची कामे :** ५०% रोपवनस्थळांना एकदा भेट देवून रोपवनाच्या स्थितीबाबत रोपवन नोंद वहीत नोंद घेतील. गुरे प्रतिबंधक चराची दुरुस्ती व देखभाल, उंचवटयावर घायपात व इतर काटेरी प्रजातीची रोपे लागवड व देखभाल, मरअळी भरणे, गुरे चराई पासून संरक्षण, रोपांची सरासरी उंची, जीवंत रोपांची टक्केवारी, आगिपासून संरक्षण इत्यादी कामे योग्यरीत्या होईल याची खात्री करतील व याबाबत तृटी व सूचना रोपवन नोंद वहीत लिहून दिनांकासह स्वाक्षरी करतील व दिलेल्या सूचनांचे पालन होईल यासाठी पाठपूरावा करतील.

(१०) **चतुर्थ व पंचम वर्षीय कामे :** प्रत्येक रोपवनस्थळांला वर्षातून कमीत कमी एकदा भेट देवून रोपवनाचे अवैध चराई तसेच आगीपासून करण्यात आलेल्या संरक्षणाबाबत निरीक्षण करून, रोपवनाची संरक्षण कामे योग्यरीत्या होणेबाबत खात्री करतील व गुरे प्रतिबंधक चर व कुंपण कामात आवश्यकतेनुसार वेळेवर दुरुस्ती करणेबाबत कारवाई करतील. रोपवनाचे संरक्षणाकरिता लावण्यात आलेले मजूर रोपवन संरक्षण कामे प्रभाविपणे करणे बाबत, गुरे प्रतिबंधक चराच्या किरकोळ दुरुस्ती बाबत योग्य कारवाई करणे व दिलेल्या सूचनांचे पालन केल्या जाते किंवा कसे याची शहानिशा करतील. निरीक्षणाचेवेळी देण्यात आलेल्या सूचना, कामाच्या सुधारणेबाबत दिलेल्या सूचनांचे पालन होते किंवा कसे याचा पाठपुरावा करणे व कामाची गुणवत्ता राखणे उप वनसंरक्षक यांची जबाबदारी राहील.

(११) सर्व रोपवन कामावर, रोपवाटिकेवर खर्च योग्यरीत्या होतो किंवा कसे याचा वेळोवेळी आढावा घेतील व अनियमितता झाल्यास संबंधिता विरुध्द तातडीने कार्यवाही करतील.

(१२) वनपाल, वन परिक्षेत्र अधिकारी व सहाय्यक वन संरक्षक यांना नेमून दिलेली कामे, निरीक्षणाचे मापदंड, जबाबदा-याचे पूर्णपणे पालन करतात किंवा कसे यावर संनियंत्रण व प्रशासकीय नियंत्रण करतील व कामाची गुणवत्ता राखणेसाठी दक्षता घेतील व याबाबत दर महिन्यात आढावा घेतील.

(१३) रोपवन नोंदवहीत वन परिक्षेत्र अधिकारी व सहाय्यक वन संरक्षक यांचे पाहणीची नोंद, जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांची सरासरी उंची, अंदाजपत्रकीय तरतूद (बाबनिहाय) व खच्र लागवड केलेल्या प्रजाती इत्यादी माहिती नोंदविली जाईल याची शहानिशा करतील.

(१४) पूर्णत्व अहवाल: रोपवनाचा ५ वर्ष पूर्ण झाल्यावर तसेच पर्यायी वरीकरण रोपवनाचा कालावधी १० वर्ष झाल्यावर रोपवनाची स्थिती, जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांची सरासरी उंची, खर्च, रोपांमधील अंतर, चराई, आगीपासून संरक्षण, गुरेप्रतिबंधक चर उंचवटयाची स्थिती इत्यादीबाबत पूर्णत्व अहवाल प्राप्त करतील व सदर अहवाल मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) यांना सादर करतील. रोपवनाचा ५ वर्ष पर्यंत (पर्यायी वनीकरण रोपवनाचे १० वर्ष पर्यंत) प्रत्येक रोपवनाची संरक्षणाची स्थिती; जीवंत रोपांची टक्केवारी; रोपांची सरासरी उंची; गुरे प्रतिबंधक चराची स्थिती, त्याची दुरुस्ती व देखभार, उंचवटेवर काटेरी प्रजातीची देखभाल, निंदणी, मरअळी भरणे, अवैध चराई, खर्च

Scanned by CamScanner

इत्यादीचा बाबत त्रैमासिक आढावा घेऊन कामावर संनियंत्रण करतील. अनियमितता झालेल्या प्रकरणी तातडीने कार्यवाही करतील. मूल्यांकन शाखेकडून प्राप्त अहवालासनूसार कार्यवाही करणेबाबत पाठपूरावा करतील.

(१५) सहाय्यक वनसंरक्षक व वन परिक्षेत्र अधिकारी प्रत्येक पाहणीचेवेळी रोपवन नोंदवहीत नमुद करतात किंवा कसे व कामाची तपासणी करुन मोजमाप पुस्तिकेत प्रमाणित करतात किंवा कसे याबाबत प्रत्येक निरीक्षणाचेवेळी आढावा घेतील.

**५. मुख्य वन संरक्षक :**

(१६) रोपवनातील विविध कामे सुरू असतांना प्रत्येक वन विभागातील पूर्व पावसाळी कामे, सुरू असलेली प्रातिनिधीक ५ कामे, प्रथम वर्षाची ५ कामे व व्दितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम वर्षाची ५ कामे अशी एकूण कमीत कमी १५ प्रातिनिधीक रोपवनस्थळांना भेटी देवून पाहणी करतील. सदर कामाव्यतिरिक्त दर वर्षी पर्यायी वनीकरण अंतर्गत करण्यात आलेल्या किमान ५ रोपवनाचा निरीक्षण करणे आवश्यक राहील. पाहणीचे वेळी रोपवनाची पूर्व पावसाळी कामे, रोपे लागवड, नींदणी, गुरे प्रतिबंधक चराची देखभाल व दुरुस्ती, आगिपासून व गुरे चराई पासून रोपवनाचे संरक्षण इत्यादी बाबत आढावा घेऊन योग्य सूचना देतील व सदर सूचना रोपवन नोंद वहीत लिहून दिनांकासह स्वाक्षरी करतील. तसेच देण्यात आलेल्या सूचनांचे पालन होते किंवा कसे याचा पाठपुरावा करतील. रोपवन कामाबाबत व कामाचे निरीक्षणाबाबत वनरक्षक, वनपाल, वन परिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वन संरक्षक, उप वन संरक्षक/विभागीय वन अधिकारी/उप विभागीय वन अधिकारी हे विहित केलेल्या मापदंडानुसार रोपवनाची तपासणी करुन गुणवत्ता राखणे, रोपवनाचे संरक्षण याकरिता त्यांची जबाबदारी पार पाडतात किंवा कसे याची शहानिशा करतील. वन परिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, उप वन संरक्षक यांचे रोपवनाचे तपासणी व निरीक्षणाबाबत दर महिन्यात आढावा घेऊन नियंत्रण करतील. रोपवनाचा ५ वर्ष पर्यंत (पर्यायी वनीकरण रोपवनाचे १० वर्ष पर्यंत) प्रत्येक रोपवनाची संरक्षणाची स्थिती; जीवंत रोपांची टक्केवारी; रोपांची सरासरी उंची; गुरे प्रतिबंधक चराची स्थिती, त्याची दुरुस्ती व देखभार, उंचवटेवर काटेरी प्रजातीची देखभाल, निंदणी, मरअळी भरणे, अवैध चराई, खर्च इत्यादीचा बाबत त्रैमासिक आढावा घेऊन कामावर संनियंत्रण करतील. अनियमितता झालेल्या प्रकरणी तातडीने कार्यवाही करतील. मूल्यांकन शाखेकडून प्राप्त अहवालासनूसार कार्यवाही करणेबाबत पाठपुरावा करतील. ५ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक रोपवनाची सध्यस्थिती, जीवंत रोपांची टक्केवारी, रोपांची सरासरी उंची, खर्च, रोपवनाच्या यशस्वितेबाबत सर्व उप वन संरक्षक यांचे सोबत सखोल आढावा घेतील व दूर्लक्ष झालेल्या ठिकाणी संबंधितांचे विरुध्द कार्यवाही करतील.

६. **रोपवाटिकेची कामे :** वन परिक्षेत्र अधिकारी प्रत्येक महिन्याला १०० टक्के रोपवाटिकेचे निरीक्षण करतील. सहायक वन संरक्षक प्रत्येक महिन्यात १०० टक्के रोपवाटिकेचे निरीक्षण करतील. रोपवाटिकेत आणलेल्या माती, रेती, शेण खत याची मात्रा, गुणवत्ता १००% तपासून रोपवाटिकेच्या मोजमाप पुस्तिकेत त्याबाबत प्रमाणित करुन दिनांकासह स्वाक्षरी करतील. उप वन संरक्षक प्रत्येक महिन्यात २५% रोपवाटिकेचे निरीक्षण करतील. दर माहिन्यात पूर्वी पाहणी न केलेल्या रोपवाटिकेचे निरीक्षण करतील. मुख्य वन संरक्षक, ज्या-ज्या वेळी रोपवनाला भेट दयायला येतील, त्यावेळी त्या

Scanned by CamScanner

विभागातील रोपवाटिकेचेही निरीक्षण करतील. निरीक्षणाचेवेळी रोपवाटिकेची कामे योग्यरीत्या करण्याची खात्री करतील व याबाबत सूचना रोपवाटिका नोंदवहीत नमुद करतील.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प, नियोजन व विकास),
महाराष्ट्र राज्य, नागपूर

Scanned by CamScanner